॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २३ ऑक्टोबर : जळगाव : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या ३६व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षेचे (एम-सेट) आयोजन रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी जळगाव केंद्रावर करण्यात आले आहे. शहरातील आठ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होणार असून, एकूण ३ हजार १४४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ होणार आहेत.

जळगाव शहरातील खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या मुळजी जेठा महाविद्यालय परिसरातील स्वामी विवेकानंद भवन-अ (केंद्र क्रमांक १४०१), स्वामी विवेकानंद भवन-ब (१४०२), के.सी.ई.चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय (१४०३), एस.एस. मणियार विधी महाविद्यालय (१४०४), ए.टी. झांबरे महाविद्यालय (१४०५), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च सेंटर (१४०६), अभियांत्रिकी व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय (१४०७) आणि ॲड. सिताराम (बबनभाऊ) आनंदरामजी बाहेती महाविद्यालय (१४०८) या आठ केंद्रांवर परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रवेशपत्रे ऑनलाइन उपलब्ध :

एम-सेट परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) (https://setexam.unipune.ac.in) या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरताना वापरलेले लॉगिन आणि पासवर्ड वापरून प्रवेशपत्र डाउनलोड करावे. तसेच प्रवेशपत्रावरील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवेशपत्र डाउनलोड करताना काही अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे कुलसचिव तथा जळगाव केंद्रांचे सेट परीक्षा संपर्क अधिकारी डॉ. विनोद प्र. पाटील यांच्याशी ९४२३१८५०७२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २३ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता